Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 06 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०६ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून होणार आहे. देशभरात दळणवळण सुविधेला चालना देण्याच्या उद्देशानं सुरु केलेल्या या उपक्रमात नव्या जम्मू रेल्वे विभागाचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. तसंच तेलंगणा मधल्या चारलापल्ली नवीन टर्मिनल स्टेशनचं उद्घाटन आणि पूर्व किनारपट्टी रेल्वे विभागाच्या इमारतीची पायाभरणी त्यांच्या हस्ते होणार आहे.

****

देशात मेट्रोचं एक हजार किलोमीटरचं जाळं कार्यान्वित झालं असून, भारत जगात तिसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक कार्यान्वित मेट्रो जाळं असलेला देश बनला आहे. यासंदर्भात मायगव्ह इंडियानं समाजमाध्यमावर दिलेली माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामायिक केली. मेट्रो कनेक्टिव्हीटीला चालना देण्यासाठी गेल्या दशकभरात मोठं काम करण्यात आलं असून, यामुळे शहरी वाहतुकीला बळकटी मिळत असून जीवनमान सुलभता वृध्दींगत होत असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. मेट्रोनं प्रवास करणाऱ्या प्रवाशांची दैनंदिन सरासरी १ कोटींहून अधिक असून २३ शहरात मेट्रो सेवा आहे. मेट्रोचे ९९८ किलोमीटरच्या जाळयाच्या प्रकल्पांचं काम सुरु आहे.

****

शिखांचे दहावे गुरू, गुरू गोविंदसिंह साहब यांच्या प्रकाश उत्सवानिमित्त आज सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरु गोविंद सिंह यांना आदरांजली अर्पण केली आहे. मानवतेच्या कल्याणासाठी गुरु गोविंद सिंह यांनी केलेलं कार्य सर्वांना प्रेरणादायी असल्याचं राष्ट्रपतींनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जंयती आज पत्रकार दिन म्हणून साजरी होत आहे. यानिमित्त काल मराठी पत्रकार संघानं मुंबईत महाराष्ट्राच्या पहिल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स मीडिया हॅकॅथॉनचं आयोजन केलं होतं. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यावेळी उपस्थित होते. पत्रकार संघटनेने यावर्षीच्या पत्रकार दिनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता ही भविष्यवेधी संकल्पना निवडली आहे; आज कृत्रिम बुद्धिमत्ता माध्यमांसहित सर्व उद्योगांमध्ये एक परिवर्तनकारी शक्ती म्हणून उदयास आली असताना ही निवड महत्त्वाची असल्याचं मत राज्यपालांनी व्यक्त केलं. खरी पत्रकारिता असेल तरच लोकशाही टिकेल असं ते म्हणाले.

****

सी एस आय आर अर्थात वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेनं पॅरासिटामोल या वेदनाशामक आणि तापावरच्या गुणकारी औषधाची निर्मिती करण्यासाठी, एक स्वदेशी तत्रंज्ञान विकसित केलं आहे. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ जितेंद्र सिंग यांनी काल सी एस आय आर च्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ही घोषणा केली. या संशोधनामुळे भारताला पॅरासिटामोलच्या निर्मितीमध्ये स्वयंपूर्ण होता येईल, तसंच या औषधाच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या घटकांसाठीचं आयातीवरचं अवलंबित्व कमी होईल, असं ते म्हणाले.

****

महाराष्ट्रातली सहकार क्षेत्राची परंपरा मोठी असून, देशाला दिशा देण्याची क्षमता या परंपरेत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. ते काल नागपूर इथं गांधीबाग सहकारी बँकेच्या इमारतीचं उद्घाटन करताना बोलत होते. सहकार क्षेत्रातल्या संस्थांसाठी विश्वासार्हता आणि गुणवत्ता हेच सर्वांत मोठं भांडवल असल्याचं गडकरी म्हणाले.

****

नांदेड जिल्ह्यातल्या श्रीक्षेत्र माळेगाव इथं काल झालेल्या कुस्तीच्या दंगलीत मानाची पहिली कुस्ती माळाकोळी इथल्या दीप कांगणे याने जिंकली. या यात्रेत वीर नागोजी नाईक मैदानात झालेल्या कुस्त्यांच्या दंगलीचं उद्घाटन नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झालं. या स्पर्धेत नांदेडसह लातूर, उस्मानाबाद, बीड, जालना, परभणी, हिंगोलीसह कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेशातल्या पहिलवानांनी हजेरी लावली होती. जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने श्रीक्षेत्र माळेगाव इथं पशु, अश्व, श्वान, शेळी, कुक्कुट प्रदर्शन आणि दुग्ध स्पर्धेचे निकाल जाहीर झाले. बक्षीस वितरण आमदार प्रतापराव चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आलं.

****

जळगाव इथं काल ६८ व्या राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते झाला. या स्पर्धेत २१ राज्यांतल्या ७०० खेळाडूंनी  सहभाग घेतला आहे.

****

पोलीस विभागाच्या नांदेड परिक्षेत्र अंतर्गत लातूर इथं पोलीस क्रीडा निवड चाचणी स्पर्धेचं उद्घाटन काल लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या हस्ते झालं. या स्पर्धेसाठी नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर या जिल्ह्यातून २४ खेळ प्रकारात ४५० खेळाडू सहभागी झाले आहेत.

****

श्रीलंकेत होणार असलेल्या दिव्यांग क्रिकेट करंडक स्पर्धेकरता भारतीय निवड समितीनं १७ दिव्यांग खेळाडूंची निवड केली असून, संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी विक्रांत रवींद्र केणीवर सोपवली आहे. या स्पर्धेचा पहिला सामना १२ जानेवारीला भारत आणि पाकिस्तान या दोन संघात रंगणार असून अखेरचा सामना २१ जानेवारीला होणार आहे. दूरदर्शनवर या स्पर्धांचं थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे.

****